# Body Mass Index Checkup at Kreeda Mahotsav 2019




लोकमत

यंत्रणा सज्ज : वीस विद्यापीठांचे तीन हजार विद्यार्थी सोलापुरात दाखल

# विद्यापीठाच्या क्रीडा महोत्सवात खेळाडूंची होणार शरीररचना तपासणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात होणाऱ्या राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवात राज्यातील वीस विद्यापीठांचे जवळपास तीन हजार विद्यार्थी व संघ व्यवस्थापक सहभागी होणार आहेत. त्या सर्व विद्यार्थ्यांना सोलापूर विद्यापीठातील हे क्रीडा महोत्सव आठवणीमध्ये राहण्यासाठी आणि खेळाडूंना आपल्या आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी विद्यापीठाकडून या क्रीडा महोत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची बॉडी कंपोझिशन ॲनालिसस (शरीररचना) तपासण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. या विद्यार्थ्यांची तपासणी तर करण्यात येणार आहेच सोबत प्रत्येक खेळाडूला आरोग्यपस्तिका विद्यापीठाकडून भेट देण्यात येणार आहे.

राज्यपाल कार्यालयाकडून सोलापूर विद्यापीठात प्रथमच भरविण्यात आलेल्या या क्रीडा महोत्सवासाठी विद्यापीठाकडून जय्यत तयारी सुरु करण्यात आली आहे. सर्व स्पर्धा सुरळीत पार पडण्यासाठी विशेष तयारी विद्यापीठाकडून सुरु आहे. यासाठी जवळपास ७० विविध समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे. या क्रीडा महोत्सवासाठी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्व खेळाडूंना विद्यापीठामार्फत आरोग्यभान निरामय क्रीडा जीवन ही पुस्तिका दिली जाणार आहे. यामध्ये क्रीडा क्षेत्राशी निगडित स्पोर्ट्स एन्जुरी फिटनेस, स्पोर्ट्स मॅनेजमेंट, योगा, स्पोर्ट न्यट्रिशन आदी विविध विषयांवर मान्यवरांचे लेख या पुस्तिकेत समाविष्ट केलेले आहेत. या पुस्तिकेचे प्रकाशन महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते गुरूवारी २६ डिसेंबर रोजी होणार आहे.

सहभागी खेळाडूंना प्रथमोपचार करण्याची गरज भासल्यास त्याकरि[ता] प्रत्येक प्रकारच्या मैदानाजवळ ए[क] प्रथमोपचार कक्ष याप्रमाणे एकूण ती[न] प्रथमोपचार कक्षाची उभारण[ी] करण्यात आलेली आहे. य[ा] प्रथमोपचार कक्षात डॉक्टर्स, न[र्स] यांची सुसज्ज व्यवस्था करण्या[त] आली आहे. यासाठी सोलाप[ूर] शहरातील सेठ गोविंदजी राव[जी] आयुर्वेदिक महाविद्यालय तसे[च] यशोधरा नर्सिंग महाविद्यालयाती[ल] डॉक्टरांचा सहभाग असणार आ[हे.] याशिवाय तातडीचे वैद्यकीय उपचा[र] देण्यासाठी छत्रपती शिवाजी महारा[ज] सर्वोपचार रुग्णालय सोलापूर यां[चे] वैद्यकीय पथक व रुग्णवाहिक[ा] विद्यापीठ मुख्य परिसर व ॲथलेटिक[्स] परिसर येथे दिवसभर उपलब्ध असणा[र] आहे. अशी माहिती डॉ. अभिजि[त] जगताप यांनी दिली.

## मैदानाशेजारी विशेष कक्ष

- या क्रीडा महोत्सव कालावधीत सहभागी सर्व खेळाडूंची बॉडी कंपोझिशन ॲनालिसस तपासणी विद्यापीठ आरोग्य केंद्रामार्फत होणार आहे. त्याकरिता प्रत्येक मैदानाशेजारी विशेष कक्ष उघडण्यात आले आहे. या तपासणीमध्ये विद्यार्थ्यांचे बॉडी मास इंडेक्स, शरीरातील चरबीचे तसेच पाण्याचे प्रमाण अशा विविध घटकांची तपासणी करून त्यावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याशिवाय खेळाडूंवर ॲक्युप्रेशरच्या माध्यमातून उपचार करण्याकरिता विद्यापीठ आरोग्य विज्ञान संकुलाच्या ॲक्युप्रेशर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी कार्यरत असणार आहेत.

> “ या क्रीडा महोत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व खेळाडूंची बॉडी कंपोझिशन ॲनालिसस तपासणी करण्यात येणार आहे. याचा रिपोर्ट त्यांना लगेचच देण्यात येणार आहे. जर त्या विद्यार्थ्यांना पुढील सल्ला पाहिजे असल्यास त्यांच्यासाठी संपर्क नंबरही देण्यात आला आहे. याचा लाभ जवळपास ३ ते ४ हजार विद्यार्थी घेतील असा अंदाज आहे.
>
> **- डॉ. अभिजित जगताप**
> **विद्यापीठ वैद्यकीय अधिकारी**

Hello Solapur
Page No. 6 Dec 26, 2019
Powered by: erelego.com

